e-news letter

Government of Maharashtra
Water Resources Department

# आयसीआयएस बुलेटिन
# ICIS Bulletin

Volume : II Issue : 11 March 2013

Editorial Board
Mrs.Purnima Desai, Ulhas Pujari,
Mrs. Shilpa Jadhav,
Mrs. Dhanashree Limaye

Our Vision
*Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

Editor
T. N. Munde
Executive Editor
Sharad Dabhadkar

## संपादकीय



आयसीआयएस प्रकल्पाला तसेच जलसंपदा विभागाच्या ई प्रशासन प्रकल्पाला ई–जलसेवा असे नामकरण करण्यात आल्याचे आपणास कळवताना अत्यानंद होत आहे. यापुढे या प्रकल्पाला ई–जलसेवा असे संबोधण्यात येणार आहे. चौतीस मोडूल्स पैकी सतरा मोडूल्स संकेतस्थळावर उपलब्ध असून उर्वरित मोडूल्स मार्चअखेर पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न चालू आहेत. मागील महिन्यांत निर्धार केल्याप्रमाणे आम्ही प्रादेशिक व मंडळ स्तरावरील मिशन टीमच्या बैठका औरंगाबाद , नागपूर व अमरावती येथे दिनांक १३/२ व २०/२/१३ ला आयोजित केल्या आहेत. या बैठकीस खुपच चांगला प्रतिसाद मिळाला. औरंगाबाद येथील बैठकीस सर्व अधीक्षक अभियंता तर अमरावती येथे श्री. आर.बी.शुक्ला व नागपूर येथे श्री.व्ही.एम.कुलकर्णी व श्री.अशोक खापरे, हे सर्व मुख्य अभियंता आवर्जून उपस्थित होते. त्यांनी या बैठकीत सहभाग घेऊन मौलिक मार्गदर्शन केले. त्यांचे आम्ही आभारी आहोत. या बैठकीत मिशन टीमने यापुढे करावयाच्या कामाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच प्रणालीत माहिती भरण्याचे महत्त्व व त्यामध्ये येणाऱ्या अडचणीबद्दल विचार विनिमय व शंका समाधान करण्यात आले. मिशन टीमची पुढील बैठक नासिक येथे दिनांक १/३/१३ रोजी आयोजित करण्यात येत आहे. प्रकल्प यशस्वी करण्याची जबाबदारी ही आता मिशन टीमची असून त्यांना लागणारे सर्व ते तंत्रज्ञान, प्रशिक्षण व सहाय्य करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय कटिबद्ध आहे. मोडूल्स मध्ये माहिती हि त्या त्या क्षेत्रीय कार्यालयाने भरावयाची असून ती माहिती त्यांच्याच कामासाठी व वरिष्ठ स्तरावर संनियंत्रण करण्यासाठी भविष्यात उपयुक्त ठरणार आहे, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील महिन्यात आता प्राधान्याने मंडळनिहाय बांधकाम व जलव्यवस्थापन या कार्यप्रकारातील मास्टर ट्रेनर्स तयार करावयाचे असून ते मास्टर ट्रेनर्स त्या मंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षित करतील. तरी प्रशिक्षण प्रभावीपणे देऊ शकतील अशा मास्टर ट्रेनर्सची नावे सत्वर प्रकल्प व्यवस्थापन विभागास कळविणेत यावीत. कार्यालयास पुरविण्यात आलेल्या संगणकाच्या नेटवर्किंगचे (लॅन) कामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तरी सर्व कार्यालयीन प्रमुखांनी हे काम करून घ्यावे. यापुढेही आपणाकडून असेच सहकार्य मिळेल व ई जलसेवा प्रकल्प हा आपल्या विभागाचा मानबिंदू ठरेल असा विश्वास आहे.

ई चॅम्पियन्स यांनी ई प्रशासन व आय.सी.आय.एस. चे प्रशिक्षण त्यांच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करून याबाबत जागरूकता निर्माण करावी व याचे वृत्त व फोटो आय.सी.आय.एस.बुलेटीन कडे पाठवावे. आपल्या मंडळाअंतर्गत प्रशिक्षण झालेल्या कर्मचाऱ्यांमधून संगणकाची आवड असणाऱ्यांची निवड करून नावे कोयना संकल्प चित्र मंडळास कळविण्यात यावीत.

श्री. प्रसाद नार्वेकर, कार्यकारी अभियंता, सातारा यांनी जलसंपदा विभागासंबंधी शासन निर्णय संकलन करुन पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांचे व त्यांच्या सहकार्यांचे विशेष आभार !!

**कार्यकारी संपादक**

## ई- जलसेवा: अंमलबजावणीसाठी प्रोजेक्ट मिशन टिम

**पी. आर. भामरे**,महासंचालक, मेरी, नाशिक

एकात्मिक संगणकीय माहिती प्रणाली (ई–जलसेवा) या जलसंपदा विभागाच्या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने चालू आहे. या प्रकल्पासाठी पथदर्शी तत्त्वावर प्रथमत: संपूर्ण महाराष्ट्रातील ४२ प्रकल्पांची निवड करण्यात आली असून या प्रकल्पांची माहिती प्रणालीमध्ये भरण्याचे काम चालू आहे. आतापर्यंत या प्रकल्पाची १७ मोड्यूल्स कार्यान्वित करण्यात आली असून उर्वरित मोड्यूल्स ३१ मार्च २०१३ पर्यंत कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. महाराष्ट्रात प्रादेशिक स्तरावरील १५ व मंडळ स्तरावरील ६४ प्रोजेक्ट मिशन टीमची स्थापना करण्यात आली असून यापुढील कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये या मिशन टीमचा मोलाचा सहभाग असणार आहे. मिशन टीमच्या बैठका यापूर्वी औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे संपन्न झाल्याची माहिती मिळाली. नासिक येथील १ मार्च २०१३ ची बैठक हा या उपक्रमाचाच भाग आहे. आज अखेर महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक विभागामध्ये उपयोजित प्रशिक्षणे यशस्वीरित्या घेण्यात आली असून ६५० अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आल्याची माहिती अधीक्षक अभियंता व प्रकल्प संचालक, श्री.मुंडे टी.एन. यांचेकडून मिळाली. हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून या मधून जलसंपदा विभागाची प्रतिमा जनमानसात उंचावण्यास मोलाची मदत होईल अशी खात्री आहे. प्रकल्पाची एकंदरीत गती पाहून यापुढेही जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने प्रकल्पाची विहित मुदतीत पूर्तता करण्यासाठी मी मन:पूर्वक सुयश चिंतीतो.

## आयसीआयएस प्रकल्पासाठीचे बोधचिन्ह

e जलसेवा
Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

## अभिनंदन! अभिनंदन!!

### आयसीआयएससाठी भरीव कामगिरी



श्री. प्रकाश फंड



श्री. पृथ्वीराज फाळके

- श्री. प्रकाश फंड, उपविभागीय अभियंता, लातुर यांनी सुरुवाती पासूनच याप्रकल्पा बाबत स्वयंस्फुर्तीने सहभाग घेतला आहे. लिनक्स युनिकोड बाबत जागरुकता निर्माण केली आहे. तसेच एम७ व एम८ मध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे.
- श्री. पृथ्वीराज फाळके, सहा.का.अ., सातारा यांनी एम७ व एम८ चा माहिती घेऊन संगणकात भरण्यास व इतर सहकाऱ्यांना त्यासंबंधी मार्गदर्शन करुन प्रोत्साहित करीत आहेत.

## महत्त्वाचे

### प्रणालीत माहिती भरणे (डाटा डिजीटायझेशन)

एकात्मिक संगणकीय माहिती प्रणाली ही मुख्यत्वे प्रकल्पाची माहिती (सध्याची व पूर्वीची) प्रक्रियेवर पूर्णत: अवलंबून आहे. पथदर्शी प्रकल्पावरील अधिकाऱ्यांसाठी माहिती कशी भरायची याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. लातूर व सातारा वगळता अन्य भागातून माहिती भरण्याचा वेग समाधानकारक नाही.

तरी सर्वांना माहिती भरण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. याबाबत अडचणी व शंका असल्यास त्वरीत प्रकल्प व्यवस्थापन विभाग (पीएमओ) यांचेशी संपर्क साधून निराकरण करुन घ्यावे. कृपया सर्व पथदर्शी प्रकल्पांची माहिती मार्च २०१३ अखेर प्रणालीमध्ये भरली जाईल. यासाठी आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

## प्रोजेक्ट मिशन टीम बैठक क्षणचित्रे









## *ICIS News & appeal*

- During last one month, RPMT & CPMT meetings were arranged at Aurangabad, Amravati & Nagpur.
- Next RPMT & CPMT meetings will be held at Nasik, Pune & Mumbai
- Master trainers names are requested from circle office. There two weeks training is planed in April, 2013.
- The networking (LAN) work will start soon by HCL, all are requested to complete the work through HCL.
- M7 - M8 De-linking work completed, they can enter DATA now. Training session for this were arranged at Latur & Nanded.
- Training of Pilot Phase II modules completed.

*For any queries related to software, pl. contact Wipro Helpdesk on 08624957168*

### Be an ICIS e-news author......

We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day department activities.

